## चित्रपट - दहा वाजता

'दहा वाजता' ही रोज रात्री दहा वाजता एकमेकांची आठवण काढण्याचा संकेत पाळणाऱ्या दोन प्रेमिकांची आगळी प्रेमकथा. या चित्रपटातील गीते आधी लिहिली गेली आणि नंतर चाली लावण्यात आल्या. त्यामुळे यातील सर्व गीतांच्या रचना उत्कृष्ट झाल्या आहेत. 'हवास मज तू हवास सखया', 'गोड गुपित कळलंय मला', 'तो म्हणाला, ती म्हणाली', 'चल थरकत मुरकत डौलात रे' या गीतांत गोडवा तर आहेच पण नाविन्यही आहे.

नायकाच्या गीतांसाठी सुप्रसिद्ध भावगीतगायक गजाननराव वाटवे आणि नायिकेच्या गीतांसाठी लीला पाठक यांनी पार्श्वगायन केले आहे. त्यामुळे गाण्यातील कृत्रिमपणा कमी झाला आणि शब्दोच्चार रसानुकुल आणि भावव्यक्ती परिणामकारक झाली आहे. ती खास भावगीते वाटतात. यातील 'तो म्हणाला, ती म्हणाली' या गीतावरून त्या चित्रपटाची जाहिरात 'तो आणि ती यांचे 'ते" अशी केली होती.

## चित्रपट - दहा वाजता

### हवास मज तू हवास सखया

हवास मज तू हवास सखया

हृदयी माझ्या भाव उसळती
ओठावरती शब्द नाचती
रचावया परि कविता पंक्ती
हवास मज तू हवास रे.

भुलवित्ती खुलविती रसिक मनाला
सुमनांचा मी संचय केला
गुंफाया परी मोहक माला
हवास मज तू हवास रे.

असे कुंचली रंगही असती
धवल फलकही आहे पुढती
रेखाया परी रम्य आकृती
हवास मज तू हवास रे.

स्नेहही आहे, आहे पणती
मंदिरातल्या मूर्तीपुढती
उजळाया परि जीवनज्योती
हवास मज तू हवास रे.

## चित्रपट - दहा वाजता

### गोड गुपित कळलं मला

गोड गुपित कळलं मला, मला, गुपित कळलं मला

मांडव घाला करा तयारी, नवऱ्याला ही पसंत नवरी
मुहूर्त ठरवा चला, चला, गुपित कळलं मला.

नवरा नवरी सजवा मिरवा, जेवण घाला गाव बोलवा
खंडीचे लाडू वळा वळा, गुपित कळलं मला.

लाजू नको ग घास घाल ना
ऐका ऐका गोड उखाणा, करू नका गलबला

"समोरच्या कोनाड्यात ठेवले पेढे
अशोकपंत झाले प्रेमाने वेडे"
म्हणुनि भाळले हिला हिला, गुपित कळलं मला.

वहिनी माझी आशाराणी, मुला मुलींची गोजिरवाणी
सेना होवो तिला तिला गुपित कळलं मला.

## चित्रपट - दहा वाजता

### तो म्हणाला सांग ना गे मी तुझा

तो म्हणाला सांग ना गे मी तुझा ना साजणी
ती म्हणाली रत्न राया मी तुझ्या रे कोंदणी

तो म्हणाला प्रेम म्हणजे वेड मजला वाटते
ती म्हणाली गोड अन् ते ओढ जीव लाविते

तो म्हणाला भावनेचे खेळ सारे नाचरे
ती म्हणाली जीवनाचा भावना आधार रे

तो म्हणाला प्रीत करिते दो जीवांची एकता
ती म्हणाली होय ना? मग का अशी ही दूरता?

## चित्रपट - दहा वाजता

### चल थरकत मुरकत डौलात रे

चल थरकत मुरकत डौलात रे

खुले धर्तीचा नूर नव्या नवलात रे
चल थरकत मुरकत डौलात रे.

चैतवैसाखाच्या संग, शिणगाराला नवा रंग
आली लगीनसराई थाटामाटात रे.

ज्योतीलागी मिळे ज्योती, दोन जीव एक होती
झरे पिर्तीच्या अम्रिताची बरसात रे.

नेऊ वाजत गाजत, राजा राणीची वरात
गड्या मिरवत चंदेरी रथात रे,

जाईल साडेसाती दूर, येईल कमाईला पूर
जरा खाऊ पिऊ राहू रंग ढंगात रे.